॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने दुसरे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलन उद्या शनिवार दि. ३ फेब्रुवारी रोजी अमळनेरच्या प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात होणार आहे. या संमेलनात १५० विद्यार्थी साहित्यिक सहभागी होतील.

अमळनेर येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू झाले असून या साहित्य संमेलनात सहभागी काही साहित्यिक या विद्यार्थी साहित्य संमेलनात विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. अमळनेर येथे विद्यापीठाचे प्रताप तत्त्वज्ञान केंद्र असून या केंद्रात शनिवार दि. ३ फेब्रुवारी रोजी एक दिवसाचे हे विद्यार्थी साहित्य संमेलन होणार आहे. पहिले युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक ऐश्वर्य पाटेकर यांच्या हस्ते सकाळी १० वाजता या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. दिवसभर चालणा-या या संमेलनात विद्यार्थ्यांचे स्वलिखित काव्यवाचन स्पर्धा, परिसंवाद, बोलीभाषा स्पर्धा असे कार्यक्रम होणार आहेत. या संमेलनाचा समारोप सायंकाळी ५ वाजता होणार आहे. साने गुरूजी यांच्या कार्याच्या अभ्यासक डॉ. चैत्रा रेडकर या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे अध्यक्षस्थानी राहतील.

……………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २ फेब्रुवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी